सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. संकीर्ण-३६२५/ प्र.क्र.१९१/ पोल-३, दि. २४/०२/२०२६.

**विषय** :- राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण (डायल-११२) प्रकल्पासाठी १७ व्या तिमाही हप्त्यासाठी देयकांची रक्कम अदा करण्यासाठी निधी वितरीत करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. संकीर्ण-३६२५/ प्र.क्र.१९१/ पोल-३, दि. २४/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२२४१५३५३२८४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 25-02-2026 17:43:10

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का क्र.१७.

प्रत,
पोलीस महानिरीक्षक, नियोजन व समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक, नियोजन व समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण (डायल-११२) प्रकल्पासाठी १७ व्या तिमाही हप्त्यासाठी देयकांची रक्कम अदा करण्यासाठी निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-३६२५/प्र.क्र.१९१/पोल-३**
गृह विभाग, २ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २४/०२/२०२६.

वाचा -

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दि.१७.०४.२०१५.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.१५०११/१९/२०१६-NERS (PM), दि.१६.०५.२०१७.
३) शासन निर्णय, गृह विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६४/विशा-३(अ), दि.०४.०८.२०१७.
४) शासन निर्णय, गृह विभाग क्र. वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/पोल-३, दि.०४.०९.२०१७.
५) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १४.०८.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
६) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई व मे. महेंद्रा डिफेन्स सिस्टिम्स लि. यांच्यात दि.११.११.२०१९ रोजी झालेला करार.
७) शासन निर्णय, गृह विभाग क्र. वितंप्र-३६२०/प्र.क्र.२१/पोल-३,दि.०५.०३.२०२०, दि.२८.०८.२०२० व दि.१८.१२.२०२०.
८) शासन निर्णय,गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-४/पोल-३,दि.२३.०६.२०२१ व दि.२४.११.२०२१.
९) शासन निर्णय, गृह विभाग क्र. वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-३/पोल-३, दि.०५.१०.२०२१, दि.१२.०१.२०२३, दि.२२.०२.२०२३ व दि.२७.०२.२०२३.
१०) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-८/पोल-३,दि.२९.०३.२०२२ व दि.३१.०३.२०२२.
११) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-९/पोल-३,दि.२२.०२.२०२३, व दि.२९.३.२०२३
१२) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-१०/पोल-३,दि.३१.०३.२०२३, व दि.२८.७.२०२३
१३) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-६/पोल-३,दि.४.९.२०२३
१४) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-६/पोल-३,दि.३१.०३.२०२३, व दि.१.११.२०२३ आणि दि.२३.१.२०२४.

१५) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-११/पोल-३,दि.५.३.२०२४, व दि.३०.३.२०२४ व दि.९.१२.२०२४, दि.३१.३.२०२५ व दि. २८.०४.२०२५

१६) शासन निर्णय, गृह विभाग क्र.संकीर्ण३६-२५११.क्र.प्र/०-भाग/११३-पोल/,दि.२५.११.२०२५ व दि. २७.०१.२०२६.

१७) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.पूरप-२०२५/प्र.क्र.८४/अर्थ-३,दि.०५.०१.२०२६.

१८) मे. महेंद्रा डिफेन्स सिस्टिम्स लि.यांची दि.१६.१२.२०२५, दि.०६.११.२०२५, दि.०९.१०.२०२५, दि.१६.१२.२०२५ व दि. ०९.१२.२०२५ रोजीची देयके.

१९) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/ डायल-११२ प्रकल्प/८१/२०१७-२०२५,दि.२४.०१.२०२६.

**<u>प्रस्तावना</u>**

राज्यातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत पोलीस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण करण्याकरिता संदर्भाधीन शासन निर्णय क्र.४ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१४.०८.२०१९ रोजीच्या बैठकीत रु.४०४,४४,६१,५१९/- (चारशे चार कोटी चव्वेचाळीस लाख एकसष्ठ हजार पाचशे एकोणीस फक्त) इतक्या प्रकल्प खर्चासह मे.महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि. यांना Letter of Intent (LOI) निर्गमित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण (डायल-११२) प्रकल्पाकरिता अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई व मे. महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि. याच्यांत करार करण्यात आला आहे. डायल-११२ प्रकल्पांतर्गत देयके अदा करण्याकरिता आतापर्यंत संदर्भ क्र.७ ते १६ येथील शासन निर्णयान्वये निधी वितरित करण्यात आला आहे.

२. डायल-११२ प्रकल्पाचे पुरवठादार मे.महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि. यांनी १७ व्या तिमाहीचे (सप्टेंबर, २०२५ ते नोव्हेंबर, २०२५) या कालावधीची एकूण रू. १३,५०,६०,१३९.१८/- इतक्या रकमेची देयके सादर केली होती. मे. अर्नेस्ट ॲन्ड यंग या कंपनीच्या सल्लागार यांनी मे. महिंद्रा डिफेन्स सिस्टिम्स् लिमिटेड यांनी सादर केलेल्या इतक्या रकमेच्या देयकांची Service Level Agreement (SLA) मधील तरतुदीनुसार पडताळणी करून सदर देयकातून दंडनीय शुल्कांची रक्कम रू. ८१,७८७.४२/- व अतिरिक्त रक्कम रू. ८.६६/- अशी एकूण रू. ८१,७९६.०८/- इतकी रक्कम कपात करून उर्वरित रू. १३,४९,७८,३४३.१०/- म्हणजेच पुर्णाकांत रू. १३,४९,७८,३४३/- इतकी रक्कम अदा करण्याची शिफारस दि. २९ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये अपर पोलीस महासंचालक (नि. व सं.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना केली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| Sr. No. | Payment Milestone | Invoice Amount (Incl.GST) | Penalty as per SLA | Excess Amount Billed | Actual Paybale Amount (Incl.GST) |
|---|---|---|---|---|---|
| *1* | *2* | *3* | *4* | *5* | *6* |
| A | Capex 1.5% Quarter 17 payment (Sep. 2025 – Nov. 2025) | 2,97,81,970/- | -- | 8.66/- | 2,97,81,961.34/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| B | Opex 1 to Opex 8 Invoices for Quarter 17 (Sep. 2025 – Nov. 2025) | 6,84,49,798.08/- | 81,787.42/- | -- | 6,83,68,010.66/- |
| C | Opex 9 Invoices for Quarter 17 (Sep. 2025 – Nov. 2025) | 3,68,28,371.10/- | -- | -- | 3,68,28,371.10/- |
| **Total A+B+C** | | **13,50,60,139.18/-** | **81,787.42/-** | **8.66/-** | **13,49,78,343.10/-** |

अपर पोलीस महासंचालक (नि व सं.), महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी डायल -११२ या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता १७ व्या तिमाहीकरिता मे.महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि. यांना रू. १३,४९,७८,३४३/- (जीएसटीसह) इतकी रक्कम अदा करण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. सदर देयक अदा करण्यास मंजुरी देऊन निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u>**

पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण (डायल-११२) प्रकल्पाचे पुरवठादार मे.महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि. यांनी १७ व्या तिमाहीच्या (सप्टेंबर, २०२५ ते नोव्हेंबर, २०२५) या कालावधीकरिता सादर केलेल्या रू. १३,५०,६०,१३९.१८/- इतक्या रकमेच्या देयकांची Service Level Agreement (SLA) मधील तरतुदीनुसार पडताळणी करून सदर देयकातून दंडनीय शुल्कांची रक्कम रू. ८१,७८७.४२/- व अतिरिक्त रक्कम रू. ८.६६/- कपात करून उर्वरित रू. १३,४९,७८,३४३.१०/- म्हणजेच पुर्णाकांत रू. १३,४९,७८,३४३/- (रू. तेरा कोटी एकोणपन्नास लाख अठ्ठ्याहत्तर हजार तीनशे त्रेचाळीस फक्त) (जीएसटीसह) इतकी रक्कम अदा करण्यास याद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

२. डायल -११२ या प्रकल्पातंर्गत १७ व्या तिमाहीच्या देयकांची अनुज्ञेय रक्कम रू. १३,४९,७८,३४३/- इतकी रक्कम मागणी क्र.बी-१, २०५५- पोलीस (००) ११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण (०१) (०५) डायल-११२ प्रकल्प (कार्यक्रम) (२०५५ ए२७५), ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री," या लेखाशीर्षाखाली वितरित करण्यात येत आहे.

३. सदर रकमेची देयके अदा करताना प्रचलित कर वजाती करून अदा करण्यात यावीत.

४. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५- पोलीस (००) ११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण (०१) (०५) डायल-११२ प्रकल्प (कार्यक्रम) (२०५५ ए२७५), ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री," या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदरहु निधी आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन घोषीत करण्यात येत आहे. तसेच त्यांनी उपरोक्त निधी आहरित करुन MAHINDRA DEFENCE SYSTEMS LTD या कंपनीच्या 209-214, Kailash Building 26, Kasturba Gandhi Marg, New Delhi-

110001 येथील HDFC बँकेच्या शाखेचे खाते क्र.00030310014800 (IFSC Code - HDFC0000003) या खात्यावर जमा करावा.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८,भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ व अ. क्र. २७ अ नियम क्र. ७६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.७.४.२०२५ व दि. ०५.०१.२०२६ अनुसार तसेच वित्त विभागाने अनौ.सं.क्र. १३५/२०२६/व्यय-७, दि.१२.०२.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२२४१५३५३२८४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.02.24 15:36:40 +05'30'

(रा.ता.भालवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक, नि. व स., महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१०. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. मे. महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि., अंधेरी पुर्व, मुंबई.
१४. वित्त विभाग, व्यय-७/वित्तीय सुधारणा, मंत्रालय, मुंबई.
१५. अर्थसं-१/गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. रोख शाखा/गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. / निवडनस्ती, पोल-३.